Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता. १२/०६/२०२०**

**मारामारीच्या गंभीर गुन्ह्यातील तडीपार आरोपीस**
**गुन्हे शाखा युनिट- ४, पिंपरी चिंचवड कडुन शस्त्रासह अटक**

मा. पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड यांनी लॉक डाऊन काळातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी रेकॉर्ड वरील गुन्हेगारांचा शोध घेवुन त्यांच्या वर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिल्याने आज रोजी दि. १२/०६/२०२० रोजी मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो गुन्हे शाखा,युनिट-४ यांचे आदेशान्वये पिंपरी चिंचवड आयुक्तालयाचे अभिलेखावरील तडीपार, पाहिजे, फरारी आरोपींना शोधण्याच्या अनुषंगाने पेट्रोलिंग करत फिरत असताना **पोलीस नाईक ११४२ लक्ष्मण आढारी** यांना त्यांच्या बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, पिंरी पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील तडीपार आरोपी नामे हेमंत मनोज लखन रा.सेनेट्री चाळ, पिंपरी, पुणे. हा पिंपरी ओव्हर ब्रिजखाली रोडवर थांबला आहे अशी बातमी मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन शिंदे यांच्या मार्गदर्शना खाली सपोनि अंबरिष देशमुख आणि स्टाफने नमुद आरोपीतास नमुद ठिकाणा वर जावुन ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ लोखंडी धातुचा कोयता मिळुन आल्याने व तो विनापरवांगी मा.पोलीस उप आयुक्त सो, परि – १, पिंपरी चिंचवड यांचेकडील तडीपार आदेश क्र. ४३/२०१९ मुंबई पोलीस कायदा कला ५६(१)(अ) (ब) अन्वये त्यास दि. १२/०७/२०१९ रोजी पासुन पुणे शहर आयुक्तालय परिक्षेत्र व पुणे जिल्ह्याचे हद्दीतुन दिड वर्ष मुदती करीता तडीपार केले असताना तो तडीपार आदेशाचा भंग करुन पिंपरी चिंचवड शहरात आल्याचे निष्पन्न झाल्याने त्याच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ व भा.ह.का.कलम ४(२५) प्रमाणे गुन्हा दाखल करुन पुढील कारवाई कामी पिंपरी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त मा. श्री. राजाराम पाटील, (गुन्हे शाखा) यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहन दा. शिंदे, सहा. पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ नारायण जाधव, संजय गवारे, प्रविण दळे, धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, पोना/ संतोष असवले, लक्ष्मण आढारी, तुषार शेटे, पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुरेश जायभाये, आजिनाथ ओंबासे, तुषार काळे, गुन्हे शाखा युनिट-४ यांनी केली आहे.

**(मोहन दा.शिंदे)**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
गुन्हे शाखा,युनिट-४,पिंपरी चिंचवड